MHAH230002142016

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १०१/२०१६ मधील नि. ४३ वरील आदेश</u>**

**भाऊसाहेब लक्ष्मण खेतमाळीस व इतर वि. अशोक मोतीराम खेतमाळीस व इतर**

**१.** अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, दाव्याचे कामकाज चालु असतांना दि.१६/०६/२०२१ रोजी प्रतिवादी नं.४–दत्तु लक्ष्मण खेतमाळीस मयत झालेले आहेत. मयत प्रतिवादी नं.४ यांना पत्नी असे वारस आहेत. प्रतिवादी नं.४ च्या मृत्युनंतर वादीने त्याचे वारस ९० दिवसात अभिलेखावर आणणे गरजेचे होते परंतु, वादीकडुन योग्य त्या मुदतीत पुर्तता झालेली नाही. वादीने प्रतिवादी नं.४ चे वारस दाव्यात योग्य त्या मुदतीत घेणेकामी जाणीवपुर्वक टाळाटाळ अगर विलंब केलेला नाही. वादी हे ग्रामीण भागात राहणारे असुन अडाणी व अशिक्षित असल्याने त्यांना कोर्टकचेरीचे कामाची जादा माहिती नाही. वादीचे कथनानुसार, प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी क्र.२ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द होणे गरजेचे आहे. झालेला उशिर जाणिवपुर्वक केलेला नाही. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे.

**३.** प्रतिवादीने त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास हरकत घेतली. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, अर्ज खरा, बरोबर नाही. सबब अर्ज रद्द करण्याची मागणी प्रतिवादीने केली आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी नि. ४२ येथे प्रतिज्ञापत्र दाखल करुन कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ दिनांक १६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादीतर्फे नि.४९ लगत सादर केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी नं.४ हे दि. १६/०६/२०२१ रोजी माळीनगर, श्रीगोंदा ता.

श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथे मयत झाले असून सदरचे प्रमाणपत्र दि. ०७/०७/२०२१ रोजी देण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज दि. २१/०६/२०२३ रोजी म्हणजेच १ वर्ष ११ महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादीचे म्हणणे पाहता प्रतिवादी नं.४ मयत झाल्याबाबत अभिलेखावर वाद नाही. प्रस्तुत दावा ताबा, नुकसान भरपाई मिळणेसाठी व निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होणे न्यायोचित ठरणार आहे. तसेच प्रस्तुत वादीतर्फे नि.४१ वरील प्रतिवादी नं.४ विरुध्द अबेट आदेश रद्द करण्याचा अर्ज प्रतिवादींना कॉस्ट रक्कम रुपये १०००/- भरण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

नि.४१ वरील कॉस्टची रक्कम भरण्याच्या आदेशाची पुर्तता झाल्यानंतर अर्ज नि. ४३ मंजूर करण्यात येईल.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2023.07.01 17:54:21 +0530

**( ए.एन.कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

श्रीगोंदा.
दिनांक ०१/०७/२०२३.